**मिरा भाईंदर महानगरपालिका**
**माहिती व जनसंपर्क विभाग**
**प्रसद्धीपत्रक**

- **मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील नालेसफाई आढावा घेण्याकरिता मा. आयुक्त यांचा शहरात पाहणी दौरा**

दिनांक 20 मे 2025 रोजी मिरा भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद शर्मा (भा.प्र.से.) यांनी शहरातील विविध भागांमध्ये प्रत्यक्ष पाहणी दौरा करून नालेसफाईच्या कामांचा सविस्तर आढावा घेतला. या पाहणी दौऱ्यात एम.एम.आर.डी.ए. रोड, घोडबंदर उघाडी, महाजनवाडी, मिरा गावठण, पेणकरपाडा, सृष्टी परिसर, अयप्पा मंदिर जवळील नाला यांसारख्या ठिकाणी नालेसफाईची प्रत्यक्ष स्थिती तपासण्यात आली.

मिरा भाईंदर शहरात सध्या एकूण 208 कच्चे आणि पक्के नाले असून, यांची स्वच्छता वेळेत आणि नियोजित दर्जाने पूर्ण करण्यासाठी प्रशासन कटीबद्ध आहे. या कामांसाठी आवश्यकतेनुसार जे.सी.बी. मशीन, पोकलन मशीन, बोटसह पोकलन, हायड्रा, डंपर, टोरस तसेच आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करण्यात आला आहे. नालेसफाईसाठी विभागनिहाय यंत्रणा राबवली जात असून, प्रत्येक प्रभागात कनिष्ठ अभियंता आणि स्वच्छता निरीक्षकांच्या देखरेखीखाली ही कामे सुरू आहेत. कामाच्या प्रगतीचा दररोज आढावा घेतला जात असून सर्व कामे वेळेत, प्रभावी आणि गुणवत्तापूर्ण पद्धतीने पूर्ण करण्यावर भर दिला जात आहे.

नालेसफाईच्या कामात कोणतीही हलगर्जीपणा किंवा दुर्लक्ष चालणार नसून प्रत्येक नाल्याची स्वच्छता नियोजित वेळेत पूर्ण होणे अत्यावश्यक आहे. यासाठी सर्व संबंधित अधिकारी आणि कंत्राटदारांनी जबाबदारीने काम करावे असे मा. आयुक्त यांनी सांगितले. तसेच, यावर्षी नालेसफाईच्या कामात स्मार्ट मॉनिटरिंग प्रणालीचा उपयोग करण्यात येणार आहे. यामध्ये कामाच्या GPS लोकेशन, फोटो दस्तऐवजीकरण, वेळापत्रकानुसार अहवाल यांचा समावेश असेल, जेणेकरून कामाचा दर्जा आणि पारदर्शकता सुनिश्चित होणार आहे.

नालेसफाईची प्रत्यक्ष स्थिती तपासण्या वेळी आयुक्तांसोबत अतिरिक्त आयुक्त डॉ. सचिन बांगर, उप स्वच्छता अधिकारी प्रकाश पवार, स्वच्छता निरीक्षक अनिल राठोड आणि संबंधित क्षेत्रीय अधिकारी उपस्थित होते.